# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in    Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org    Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०१८/2474

दिनांक :- 16 OCT 2018

**प्रति,**

**प्राचार्य,**

सर्व व्यावसायिक पदवीका/पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,

अमरावती विभाग, अमरावती.

**विषयः-आपले सरकार डी.बी.टी. पोर्टल वरील महाराष्ट्र शासनाची योजना सन २०१८-१९ करीता अर्ज भरण्या बाबत.**

संदर्भः- मा.संचालक, तंशिस., म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक१८/तंशिसं/डीबीटी/२०१८/३६०, दि.११.१०.२०१८.

उपरोक्त विषयाच्या अनुशंगाने सुचित करण्यात येते की, आपल्या संस्थे मध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांनि आपले सरकार डी.बी.टी. पोर्टल वर लवकरावत लवकर अर्ज भरण्याची कार्यवाही करावी जेणे करुन विद्यार्थ्यांना लाभ देता येईल. या सत्राचा शेवट व त्यानंतर प्रात्याक्षिक परीक्षा आहे. त्याअनुषंगाने पुढील १० दिवसात जास्तीत जास्त २७ ऑक्टोबर २०१८ पर्यंत सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज भरुन घेण्याच्या उद्देशाने सर्व संस्थानी (महाविद्यालयांनी)विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन कक्ष स्थापन करावे व विद्यार्थ्यांना ऑन लाईन अर्ज भरण्याचे मार्गदर्शन वेब पोर्टल वर व्हिडीओ व्दारा व आपल्या महाविद्यालयातील तज्ञ व्यक्ती व्दारे करण्यात यावे. प्राचार्यांनी व्यक्तीशः सर्व विद्यार्थी अर्ज भरतील व कोणीही पात्र विद्यार्थी वंचीत राहणार नाही याची स्वतः दक्षता घ्यावी तसेच सर्व संस्थांना सुचित करण्यात येते की, त्यांना प्राप्त झालेल्या डी.बी.टी. पोर्टल च्या लॉगीन क्रेडेन्शिअल्सचा (क्लार्क व प्राचार्य) वापर करुन उपरोक्त योजनांचे प्राप्त झालेल अर्ज त्यांच्या लॉगीनमध्ये (क्लार्क व प्राचार्य) प्रलंबित न ठेवता संबंधित योजनांच्या शासन निर्णयामध्ये नमूदअटी व शर्तीनुसार तपासून, पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज पुढील कार्यवाहीसाठी ऑनलाईन पध्दतीने पडताळणी करुनच विभागीय कार्यालयाकडे मंजूरीसाठी पाठवावे. तसेच, विद्यार्थ्यांना केलेल्या अर्जामध्ये काही त्रुटीच्या दुरुस्ती असल्यास संस्थेकडुन विद्यार्थ्यांकडे ऑनलाईनरित्या परत पाठविण्यात आलेले अर्ज विद्यार्थ्यांकडुन पुन्हा योग्य त्या दुरुस्तीसह मागविण्यात यावेत. या संबधी काही तक्रार असेल तर या कार्यालयासी संपर्क करावा. विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांची आगावू सुचना ठळक अक्षरात दर्शनि भागात लावावी. कोणताही पात्र विद्यार्थी लाभापासून वंचित राहणार नाही याची प्राचार्य यांनी खबरदारी घ्यावी. वंचित राहिल्यास संस्था जबाबदार राहतील. याची नोंद घ्यावी.

**(डॉ. डी.व्ही. जाधव)**

सहसंचालक तंत्रशिक्षण,

अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेत स्थळावर टाकरण्याकरीता

E:\backup old\backup kadam\all manish letter ghts 30.doc

829

Scanned by CamScanner